पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## प्रेसनोट क्रमांक - ७६९ दिनांक - २९/१०/२०२३

कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन पुणे शहर

### हत्याराचा धाक दाखवुन जबरी चोरी करणारे पर-जिल्हयातील टोळीस केले जेरबंद

यातील फिर्यादी यांना दिनांक ०५/१०/२०२३ रोजी इंस्टाग्रामवरून भविष्य सांगण्याचे बहाण्याने संपर्क साधून,त्यांना भविष्य पाहण्याचे बहाण्याने यातील नमुद इसमांनी त्यांचे लाल रंगाचे कार मधुन लेन नं.६ कोरेगाव पार्क पुणे येथुन घेवुन जावुन फिर्यादीस चाकुचा व फायटरचा धाक दाखवुन त्यांना शिवीगाळ व हाताने मारहाण करून फिर्यादीकडुन त्याचे पेटीएम पासवर्ड जबरदस्तीने घेवुन,त्यांचे खात्यातुन एकुण ९५,००१/- रूपये जबरदस्तीने सदर इसमांनी स्वतःचे खात्यात ट्रान्सफर करून,सदरबाबत कोणाला काही सांगितले तर जीवे मारण्याचे धमकी दिलेबाबत **कोरेगाव पार्क पोलिस स्टेशन पुणे शहर गुन्हा रजि.नं.१६१/२०२३,भा.दं.वि.क. ३९२,३९४,५०४, ५०६,३४** येथे गुन्हा दाखल आहे.

दाखल गुन्हयाचा तपास चालु असताना तपास पथकातील अधिकारी व अंमलदार असे तांत्रिक विश्लेषणा वरून तसेच फिर्यादीचे अकाऊंटवरून ट्रान्सफर केलेले पैसे याबाबत बँक खात्याची माहीती प्राप्त केली. नमुद आरोपींचा पत्ता हा जळगाव येथील असल्याने सपोनि.दत्तात्रय लिगाडे, पोलीस अंमलदार, विशाल गाडे, संदिप जढर, प्रविण पडवळ असे वरष्ठिांचे सुचनेप्रमाणे तात्काळ जळगाव येथे रवाना होवुन,जळगाव येथे दाखल गुन्हयाचा तपास करित असताना,दाखल गुन्हयातील अज्ञात आरोपींचे फोटो व अकाऊंटच्या आधारे आरोपींची नावे निष्पन्न करून नामे_रविंद्र अशोक कोळी, शिव पवन झवर, मनिष राजेंद्र कोळी,सर्व रा.एमआयडीसी जळगाव यांचे मोबाईल नंबरवरून तसेच राहते पत्यावर शोध घेतला असता ते मिळुन आले नाहीत. सदर गुन्हयात आरोपींनी वापरलेली चारचाकी वाहन कोरेगाव पार्क-येरवडा-भोसरी-नाशिक रोड-चाकण चौक मार्गावरील पन्नास पेक्षा अधिक ठिकाणचे तांत्रिक विश्लेषणाव्दारे पडताळणी करून जप्त केली.

त्यानंतर आरोपीबाबत अधिक तपास करीत असताना पोलीस अंमलदार,विशाल गाडे व प्रविण पडवळ यांना बातमी मिळाली की,सदर आरोपी हे पुणे स्टेशन परिसरात असल्याचे समजले. सदर बातमीचे अनुषंगाने वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली **रविंद्र अशोक कोळी,वय-२५, शिव पवन झवर,वय-२३, मनिष राजेंद्र कोळी,वय-२३, सर्व रा.जळगाव या सर्व आरोपींना दाखल गुन्हयात अटक केली.** अटकेत असताना आरोपींनी या प्रकारचे आणखी कोणते गुन्हे केले आहेत का याबाबत त्यांना विश्वासत घेवुन अधिक चौकशी केली असता,त्यांनी रेल्वे स्टेशन परिसरात गुन्हा केल्याचे सांगितले. त्यावर **बंडगार्डन पोलीस स्टेशन येथे दाखल गुन्हयाचे अभिलेख पाहता गु.र.नं.३०७/२३ भा.द.वि.क.३९२,३२३,३७७,३४** प्रमाणे वर नमुद तीनही आरोपी यांनी संगनमत करून गुन्हा केल्याचे तपासात निष्पन्न झाले. अशा प्रकारे हत्याराचा धाक दाखवुन जबरी चोरी करणारे आरोपींना जेरबंद करून दोन गंभीर गुन्हे उघडकीस आणून २,५०,०००/- रूपयेचा मुददेमाल जप्त करण्यात आले.

सदरची कामगिरी ही मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम विभाग पुणे,श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-२,पुणे,श्रीमती.स्मार्तना पाटील, मा.सहा.पोलीस आयुक्त,लष्कर विभाग,पुणे,श्री.संजय सुर्वे वरिष्ठ पो.निरीक्षक,श्रीमती.निलीमा पवार, पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्री.चेतन मोरे यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि. दत्तात्रय लिगाडे, पोउपनि.दिपक जाधव, स.पो.फौ.नामदेव खिलारे, पोलीस अंमलदार,विजय सावंत, संदीप जढर, विशाल गाडे, विलास तोगे, अमर क्षीरसागर, गणेश गायकवाड, रमजान शेख, मंगेश बोराडे, प्रविण पडवळ, विवेक जाधव, म.पोलीस अंमलदार,प्रज्ञा जाधव, ज्योती राऊत यांनी कामगिरी केलेली आहे.